९.८. शासकीय कार्यालयामध्ये तीन वर्षांपर्यंत दरमहा मानधनावर काम केलेल्या व रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये या अनुभवाची नोंद केलेल्या पदवीधर/पदविकाधारक अंशकालीन उमेदवारांकरिता कमाल वयोमर्यादा ५५ वर्षे राहील. (सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक अशंका १९१८/प्र.क्र.५०७/१६-अ, दिनांक ०२/०१/२०१९)

९.९. स्वातंत्र्य सैनिकांचे पाल्यांसाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे इतकी राहील. (सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक निवक-१०१०/प्र.क्र.०८/२०१०/१६-अ, दिनांक ०६/१०/२०१०)

९.१०. अगोदरच शासन सेवेत असलेल्या नियमित शासकीय कर्मचाऱ्यांकरिता वयोमर्यादा ५० वर्षे इतकी राहील. स्थानिक स्वराज्य संस्था (जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत, महानगरपालिका, नगरपालिका/नगरपरिषद, नगरपंचायत, छावणी मंडळ, इत्यादी), शासनाची महामंडळे, सार्वजनिक उपक्रम, विद्यापीठे, शासन अनुदानित शाळा/महाविद्यालये इत्यादींच्या सेवेतील कर्मचाऱ्यांना तसेच शासकीय संस्था/कार्यालयात कंत्राटी/तासिका तत्वावर कार्यरत व्यक्तींना महाराष्ट्र शासनाच्या सेवेतील कर्मचाऱ्यांसाठी असलेली वयोमर्यादेतील सूट अनुज्ञेय राहणार नाही.

९.११. उपरोक्त वयोमर्यादा ही अर्ज स्विकृतीच्या अंतिम दिनांकास विचारात घेतली जाईल.

१०. **पदांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या :-** संबंधित पदांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या यांचा तपशिल संचालनालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

११. **आरक्षण :-**

११.१. **दिव्यांग आरक्षण** :-

i) कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग शासन निर्णय क्र.व्यशिअ २०२१/प्र.क्र.४९/व्यशि-१, दिनांक २२/०२/२०२१ व शासन निर्णय क्र.व्यशिअ २०२१/प्र.क्र.४९/व्यशि-१, दिनांक १७/०६/२०२१ नुसार संबंधित पदास दिव्यांग आरक्षण लागू आहे.

ii) दिव्यांग आरक्षणाची गणना ही संबंधित नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या अधिकार क्षेत्रातील संबंधित संवर्गाच्या भरावयाच्या एकूण पदांवर करण्यात आली आहे. त्यानुसार दिव्यांगांकरिता उपलब्ध पदे, दिव्यांग प्रवर्ग व आवश्यक शारीरिक पात्रता यांचा तपशिल संबंधित पदाच्या आरक्षणनिहाय तपशिलाखाली दर्शविण्यात आला आहे. तसेच दिव्यांग उमेदवारांनी संबंधित पदाच्या पार पाडावयाच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्यांचा यांचा संक्षिप्त तपशिल कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग शासन निर्णय क्र.व्यशिअ २०२१/प्र.क्र.४९/व्यशि-१, दिनांक २२/०२/२०२१ व शासन निर्णय क्र.व्यशिअ २०२१/प्र.क्र.४९/व्यशि-१, दिनांक १७/०६/२०२१ मध्ये दर्शविण्यात आला आहे.

iii) दिव्यांग आरक्षणाच्या पात्रतेकरिता दिव्यांगत्वाचे प्रमाण किमान ४०% असणे आवश्यक आहे.

iv) दिव्यांगांकरिता आरक्षित पदावर गुणवत्तेनुसार निवड झालेल्या उमेदवारांचा समावेश, उमेदवार ज्या सामाजिक प्रवर्गाचा असेल त्या प्रवर्गात करण्यात येईल.

v) दिव्यांगांच्या नियुक्तीसाठी पात्र ठरविण्यात आलेल्या पदावर दिव्यांग व्यक्ती गुणवत्तेच्या आधारावर निवडीस पात्र ठरत असल्यास व त्यांचेसाठी पद आरक्षित नसले तरी निवडीसाठी अपात्र ठरविण्यात येत नाही.

vi) सर्वसाधारण उमेदवारांप्रमाणे तसेच प्रचलित नियमाप्रमाणे दिव्यांग उमेदवारांना देण्यात आलेल्या सवलतीचा लाभ न घेता एखाद्या पदावर निवड झाली असेल तर अशा दिव्यांग उमेदवारांची गणना दिव्यांगांसाठी आरक्षित पदावर करण्यात येत नाही व दिव्यांगांसाठी आरक्षित पद/पदे इतर दिव्यांग उमेदवारांमधून भरण्यात येतील.

vii) दिव्यांग उमेदवार एखाद्या सामाजिक प्रवर्गातील असल्यास संबंधित सामाजिक प्रवर्गामध्ये गुणवत्तेनुसार निवडीसाठी पात्र ठरण्यासाठी व परीक्षा शुल्कामधील सवलतीकरिता संबंधित जातीचे वैध कालावधीचे नॉन-क्रिमीलेयर (लागू असल्यास) प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

viii) दिव्यांग आरक्षण संदर्भात शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णय/परिपत्रकानुसार कार्यवाही करण्यात येईल. दिव्यांगांकरिता पुरेशा प्रमाणात पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर अनुशेष पुढील वर्षात दर्शविण्यात येईल. (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन शुद्धीपत्रक क्रमांक अपंग-२०१३/ प्र.क्र.३५/अ.क.२, दिनांक १५/०७/२०१३)

११.२. **अनाथ आरक्षण :-**

i) महिला व बाल विकास विभागाकडून ज्या अनाथ मुलांना अनाथ प्रमाणपत्र देण्यात आलेली आहेत अशी बालके आरक्षणासाठी पात्र राहतील. तथापि, ज्या अनाथ मुलाच्या आई-वडीलांचे निधन त्या मुलाच्या वयाची १८ वर्षे पुर्ण होण्यापूर्वी झाले असेल अशाच बालकांना आरक्षण अनुज्ञेय राहील.

ii) अनाथांसाठी आरक्षित पदावर गुणवत्तेनुसार निवड झालेल्या उमेदवारांचा समावेश तो ज्या प्रवर्गाचा आहे त्या प्रवर्गात होईल.

iii) अनाथ आरक्षणाचा लाभ घेऊन शासन सेवेत रुजू होणाऱ्या उमेदवाराला अनाथ प्रमाणपत्र पडताळणीच्या अधीन राहून तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यात येईल.

iv) अनाथालयात दाखल करण्यात येणाऱ्या काही बालकांची जात माहित नसताना त्यांच्या शैक्षणिक प्रवेशासाठी अंदाजे जात नमूद केल्याचे निदर्शनास येते. अशा बालकांच्या जात प्रमाणपत्राची वैधता होऊ शकत नसल्यास सदर उमेदवारास पदभरती नंतर खुल्या प्रवर्गात दर्शविण्यात येईल. (महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्रमांक अनाथ-२०१८/प्र.क्र.१८२/का-०३, दिनांक २३/०८/२०२१)

११.३. **महिला आरक्षण** :-

i) महिलांसाठी समांतर आरक्षणाच्या अनुषंगाने शासनाकडून विशेष तरतुदी करण्यात आल्या असून महिलांना त्यांच्याशी संबंधित सामाजिक प्रवर्गाच्या तरतुदींव्यतिरिक्त सदरच्या तरतुदी या अतिरिक्त आहेत.

ii) अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळता इतर सामाजिक प्रवर्गातील उन्नत व प्रगत गटातील महिलांना महिलांकरिताचे समांतर आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही.

iii) महिला उमेदवारांना वय, परीक्षा शुल्क इत्यादी तरतुदी त्यांच्याशी संबंधित सामाजिक प्रवर्गातील उमेदवारांप्रमाणेच राहतील.

iv) मागास प्रवर्गातील महिलांसाठी आरक्षित पदांवर दावा करणाऱ्या उमेदवारांनी सक्षम प्राधिकाऱ्याने निर्गमित केलेले जात प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

v) मागासवर्गीय व्यक्तींशी आंतरजातीय विवाह केलेल्या उमेदवारांना त्यांच्या स्वतःच्या मूळ प्रवर्गानुसार सवलती देय असतील.

vi) खुल्या प्रवर्गातील पदांवरील दाव्यासाठी व कोणत्याही सामाजिक आरक्षणाचा दावा नसणाऱ्या अमागास महिला उमेदवारांनी शासनाकडून विहित करण्यात आलेल्या नमुन्यात सक्षम प्राधिकाऱ्यांनी प्रदान केलेले वैध नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

vii) कोणत्याही सामाजिक आरक्षणाचा दावा नसणाऱ्या विवाहित अमागास महिला उमेदवारांनी त्यांच्या विवाहानंतरच्या कुटुंगाचया उम्पन्नाच्या आधारे वितरित करण्यात आलेले वैध नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. (कुटुंबाच्या व्याख्येमध्ये पती, पत्नी व अविवाहित मुलांचा समावेश होईल.)

viii) अविवाहित अमागास महिला उमेदवारांनी त्यांच्या वडिलांच्या कुटुंबाच्या उत्पन्नाच्या आधारे वितरित करण्यात आलेले नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. (कुटुंबाच्या व्याख्येमध्ये आई, वडील व अविवाहित भावंडाचा समावेश होईल.)

ix) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील महिलांना नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र सादर करण्याची आवश्यकता नाही.

x) विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), इतर मागास प्रवर्ग, विशेष मागास प्रवर्ग या मागास प्रवर्गातील महिलांनी त्यांच्या संबंधित प्रवर्गाच्या आरक्षणाकरिता आवश्यक असलेले नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र सादर केल्यास त्यांना महिलांसाठी आरक्षणाकरिता पात्र समजण्यात येईल.

xi) मागास प्रवर्गातील महिला उमेदवार अमागास महिलांसाठी आरक्षित पदावरील निवडीकरिता पात्र ठरल्यास :-

१) अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील महिलांकडे जात प्रमाणपत्र असल्यास कोणतेही नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र सादर करण्याची आवश्यकता नाही.

२) विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), इतर मागास प्रवर्ग, विशेष मागास प्रवर्ग या मागास प्रवर्गातील महिला उमेदवारांच्या बाबतीत त्यांच्या संबंधित मागास प्रवर्गाच्या आरक्षणाकरिता आवश्यक असलेले नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येईल.

३) मागास प्रवर्गातील महिला तिच्या संबंधित प्रवर्गाकरिताचे जात प्रमाणपत्र सादर करुन शकत नसल्यास किंवा सादर करु इच्छित नसल्यास अमागास महिलांसाठी आरक्षित पदांवरील निवडीकरिता अमागास (खुल्या) महिलांकरिताचे नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

४) अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळता अन्य मागास प्रवर्गातील महिला उमेदवारांच्या बाबतीत विवाहापूर्वीचे नांव अंतर्भूत असलेली क्रिमीलेयरमध्ये मोडत नसलयाबाबतची प्रमाणपत्रे ग्राह्य धरण्यात येतील.

xii) विधवा / घटस्फोटीत / परित्यक्त्या महिलांच्या बाबतीत :-

१) विधवा महिलेच्या बाबतीत ती स्वतंत्र राहत असल्यास पतीच्या निधनामुळे प्राप्त झालेले उत्पन्न तसेच तिचे स्वत:चे उत्पन्न ग्राह्य धरुन वितरित केलेले नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

२) घटस्फोटीत महिलेच्या बाबतीत तिच्या भूतपूर्व पतीकडून मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार मिळणाऱ्या पोटगीची रक्कम व तिचे स्वत:चे उत्पन्न ग्राह्य धरुन वितरित केलेले नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

३) कौटुंबिक हिंसाचार अधिनियम, २००५ अन्वये मा.न्यायालयात याचिका दाखल झालेली महिला स्वतंत्र राहत असल्यास अशा महिलेचे तिचे स्वत:चे उत्पन्न किंवा अशी महिला नोकरी करीत नसल्यास तिच्या वडिलांचे उत्पन्न नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्राकरिता ग्राह्य धरुन वितरित केलेले नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

११.४. **खेळाडू :-**

i) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क्रमांक राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक ०१/०७/२०१६ सोबतच्या परिशिष्ट-अ मध्ये नमूद तसेच दिनांक १०/१०/२०१७ व १५/११/२०१७ च्या शासन शुद्धीपत्रकान्वये सुधारीत केलेल्या स्पर्धा/खेळांमध्ये प्राविण्य प्राप्त केलेले व सदर शासन निर्णयातील क्रीडा विषयक अर्हता, सर्वसाधारण अर्हता, अटी व शर्तीची पूर्तता करणारे खेळाडू सदर आरक्षणाचा लाभ घेण्यास पात्र ठरतील.

ii) खेळाडू उमेदवाराने अर्ज करण्यापूर्वी विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य यांचेकडून खेळाच्या प्रमाणपत्राची पडताळणी करुन घेणे आवश्यक राहील अन्यथा सदर उमेदवारास खेळाडू करिता राखीव पदावर नियुक्ती अनुज्ञेय राहणार नाही.

iii) खेळाडू आरक्षणाकरिता नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र सादर करण्याची अट लागू राहणार नाही.

iv) मागास प्रवर्गातील खेळाडू उमेदवार यांना त्यांच्या सामाजिक प्रवर्गातील दाव्यांच्या अनुषंगाने जात प्रमाणपत्र (लागू असल्यास वैध नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्रासह) सादर करणे आवश्यक राहील.

११.५. **प्रकल्पग्रस्त/भूकंपग्रस्त :-** भूकंपग्रस्तांकरिता राखीव असलेल्या पदांवर नियुक्तीसाठी ज्या कुटुंबातील व्यक्तींचे भूकंपात निधन झाले आहे किंवा ज्यांचे घर पूर्णपणे कोसळले होते, त्यामुळे शासनाने त्यांना नविन घर बांधून दिले अशा व्यक्तींचे पाल्य नियुक्तीसाठी पात्र ठरतील. पात्र भूकंपग्रस्त उमदेवार पुरेशा प्रमाणात उपलब्ध न झाल्यास अशा पदांवर पात्र प्रकल्पग्रस्त उमेदवारांचा नियुक्तीकरिता विचार करण्यात येईल. प्रकल्पग्रस्त/भूकंपग्रस्त उमेदवाराने विहित प्राधिकाऱ्याने निर्गमित केलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

११.६. **पदवीधर/पदविकाधारक अंशकालीन उमेदवार :-** सुशिक्षित बेरोजगारांना अर्थसहाय्य या योजने अंतर्गत शासकीय कार्यालयांमध्ये तीन वर्षे अंशकालीन काम केलेल्या व रोजगार व मार्गदर्शन केंद्रामध्ये या अनुभवाची नोंद केलेल्या उमेदवारांना पदवीधर/ पदविकाधारक अंशकालीन उमेदवार म्हणून आरक्षण लागू राहील. पदवीधर/पदविकाधारक अंशकालीन उमेदवारांकरिता आरक्षित पदांवर पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पदांकरिता गुणवत्तेनुसार त्या-त्या प्रवर्गातील अन्य पात्र उमेदवारांचा विचार करण्यात येईल.

११.७. **माजी सैनिक :-**

i) माजी सैनिकांसाठी असलेल्या वयोमर्यादा व आरक्षणाचा लाभ घेऊन इच्छिणाऱ्या उमेदवारांनी विहित नमुन्यात सक्षम प्राधिकाऱ्याने निर्गमित केलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

ii) उमेदवार ज्या सामाजिक प्रवर्गातील असेल त्या प्रवर्गासंबंधीचे जात प्रमाणपत्र तसेच नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र (लागू असल्यास) सादर करणे आवश्यक राहील.

iii) माजी सैनिकांसाठी आरक्षित पदावर राज्य शासनाच्या सेवेमध्ये गट-क व गट-ड मधील पदावर एकदा नियुक्ती झाल्यानंतर तो धारण करीत असलेल्या पदापेक्षा उच्च श्रेणी वा अन्य संवर्गातील नियुक्तीसाठी माजी सैनिक म्हणून राज्य शासनाच्या सेवेत असलेल्या आरक्षणाचा लाभ मिळणार नाही.

iv) राज्य शासनाच्या सेवेत रुजू होण्यापूर्वी अर्ज केलेल्या पदाकरिता निवड झाली असल्यास व त्याबाबतची सविस्तर माहिती लेखी स्वयंघोषापत्राने राज्य शासनाच्या सेवेत रुजू होतांना त्याने नियुक्ती प्राधिकाऱ्यास दिली असल्यास त्यास स्वयंघोषणापत्रामध्ये नमूद केलेल्या व माजी सैनिकाचे समांतर आरक्षणाचे तत्व लागू असलेल्या पदांकरिताच माजी सैनिकाच्या आरक्षणाचा लाभ घेता येईल.

v) बडतर्फी, गैरवर्तणूक, अकार्यक्षमता या कारणांसाठी अथवा सैनिकी सेवेसाठी शारिरीक क्षमता नसल्याने किंवा आजारपणामुळे सेवा संपुष्टात आलेले माजी सैनिक वयोमर्यादेच्या सवलतीसाठी पात्र ठरणार नाही.

vi) गट-क व वगट-ड मधील पदावर एकदा नियुक्ती झाल्यानंतर तो धारण करीत असलेल्या पदापेक्षा उच्च श्रेणी वा अन्य संवर्गातील नियुक्तीसाठी माजी सैनिक म्हणून अनुज्ञेय ठरविण्यात आलेल्या वयोमर्यादेची सूट सदर नवीन नियुक्तीसाठी देखील अनुज्ञेय राहील.

११.८. **आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील उमेदवार (आ.दु.घ.) :-**

i) राज्याच्या आर्थिक दुर्बल घटकातील ज्या व्यक्तींच्या जातींचा शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार घोषित मागासवर्गीयांमध्ये समावेश नसेल अशा उमेदवारांना आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकासाठीच्या आरक्षणाचा लाभ अनुज्ञेय आहे.

ii) कुटुंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न शासनाकडून विहित करण्यात आलेल्या मर्यादेच्या आत असणाऱ्या उमेदवारास आर्थिकदृष्ट्या दुर्बल समजण्यात येईल व सदर आरक्षणाच्या लाभासाठी तो पात्र असेल.

iii) सदर आरक्षणाच्या प्रयोजनार्थ “कुटुंब” म्हणजे उमेदवाराचे आई-वडील व १८ वर्षापेक्षा कमी वयाची भावंडे तसेच उमेदवाराची १८ वर्षांपेक्षा कमी वयाची मुले व पती/पत्नी यांचा समावेश होईल.

iv) “कुटुंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न” यामध्ये कुटुंबातील सर्व सदस्यांच्या सर्व स्त्रोतामधून म्हणजेच वेतन, कृषी उत्पन्न, उद्योग-व्यवसाय व इतर सर्व मार्गातून मिळणाऱ्या उत्पन्नाचा समावेश असेल.

v) आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाच्या पात्रतेसाठी संबंधित तहसीलदार यांनी वितरीत कलेले व राज्य शासकीय सेवा व शैक्षणिक संस्थांच्या प्रवेशाकरिता राज्य शासनाचा प्रमाणपत्राचा नमुना वापरणे आवश्यक राहील.

vi) केंद्रीय सेवांचा लाभ घेण्यासाठीचे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांचे प्रमणपत्र, राज्य शासकीय सेवांसाठीच्या पदभरतीकरिता वापरता येणार नाही.

१२. **जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र -** अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), विशेष मागास प्रवर्ग, इतर मागास वर्गीय, उमेदवाराना संबंधित आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास सक्षम प्राधिकाऱ्याने निर्गमित केलेले जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

१३. **अनुभव** - उमेदवाराने अनुभवासंदर्भातील प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक राहील. रोजंदारी, कार्यव्ययी, करार पद्धतीवर, मानधन इ. स्वरुपात केवळ पूर्णवेळ काम केले असल्यासच असा कालावधी अनुभव म्हणून ग्राह्य धरण्यात येईल. तासिका, नियतकालिक, अंशकालीन, विद्यावेतन, अभ्यागत, अंशदानात्मक, विनावेतन तत्वावर केलेल्या अंशकालीन सेवेचा तसेच प्रभारी म्हणून नेमणूकीचा कालावधी तसेच अतिरिक्त कार्यभाराचा कालावधी अनुभवासाठी ग्राह्य धरला जाणार नाही. (सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्रमांक एसआरव्ही-२००४/प्र.क्र.१०/ ०४/१२, दिनांक ०३/०७/२००४)

१४. **लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन -** महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम, २००५ मधील तरतुदीनुसार हयात असलेल्या अपत्यांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक २८/०३/२००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या अपत्यामुळे उमेदवार शासकीय सेवेतील नियुक्तीसाठी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल. या नियमातील व्याख्येनुसार लहान कुटुंब याचा अर्थ, दोन अपत्ये यांसह पत्नी व पती असा आहे. उमेदवाराने नियुक्तीच्या वेळी लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन सादर करणे आवश्यक राहील.

१५. **महाराष्ट्र-कर्नाटक सीमा भागातील उमेदवार -** महाराष्ट्र शासनाने दावा सांगितलेल्या सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र.मकसी-१००७/प्र.क्र.३६/का.३६, दि.नांक १०/०७/२००८ मध्ये नमूद ८६५ गावातील मराठी भाषिक उमेदवार हे सेवा प्रवेश नियमातील सर्व अटींची पूर्तता करीत असल्यास, ते अर्ज करण्यास पात्र राहतील. सदर उमेदवारांनी त्यांच्या सदर ८६५ गावांमधील वास्तव्याबाबतचा सक्षम प्राधिकाऱ्यांचा विहित नमुन्यातील दाखल सादर करणे अनिवार्य राहील. सदर उमेदवारांना सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्गापैकी कोणत्याही प्रवर्गाचा लाभ अनुज्ञेय राहणार नाही.

१६. **सामायिक परीक्षा / व्यावसायिक चाचणी** - जाहिरातीमधील पदाकरिता खालीलप्रमाणे Computer Based Test स्वरुपाची सामायिक परीक्षा/व्यावसायिक चाचणी घेण्यात येईल. उमेदवाराने अर्जात नमूद केलेल्या माहितीच्या आधारे मूळ प्रमाणपत्र/दस्तऐवज यांची पडताळणी करण्याच्या अटीस अधिन राहून उमेदवारास सामायिक परीक्षा/व्यावसायिक चाचणीकरिता उपस्थित राहण्याची परवानगी देण्यात येईल. परीक्षेस उपस्थित राहण्यास उमेदवारास परवानगी दिली याचा अर्थ उमेदवार सदर पदाकरिता पात्र आहे असा होत नाही.

i) निदेशक (पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रम) पदाकरिता १२० गुणांची सामायिक परीक्षा (CBT-१) व ८० गुणांची व्यावसायिक चाचणी (CBT-२) घेण्यात येईल. सामायिक परीक्षेत ४५% किंवा त्यापेक्षा अधिक गुण प्राप्त केलेल्या उमेदवारांची व्यावसायिक चाचणी (CBT-२) घेण्यात येईल. सामायिक परीक्षा (CBT-१) तसेच व्यावसायिक चाचणी (CBT-२) करिता उपस्थित राहिलेल्या व एकूण गुणांच्या (२०० गुण) ४५% किंवा त्यापेक्षा अधिक गुण प्राप्त केलेल्या तसेच विहित शैक्षणिक अर्हता, अनुभव व अन्य आवश्यक अर्हता धारण केलेल्या उमेदवारांचा गुणवत्ता यादीकरिता विचार केला जाईल.

ii) निदेशक (पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रम) पदे वगळता उर्वरित पदांकरिता २०० गुणांची सामायिक परीक्षा (CBT) घेण्यात येईल. सदर पदांकरिता व्यावसायिक चाचणी राहणार नाही. सामायिक परीक्षेत ४५% किंवा त्यापेक्षा अधिक गुण प्राप्त केलेल्या तसेच विहित शैक्षणिक अर्हता, अनुभव व अन्य आवश्यक अर्हता धारण केलेल्या उमेदवारांचा गुणवत्ता यादीकरिता विचार केला जाईल.

१७. **परीक्षा शुल्क** :- उमेदवार त्याच्या शैक्षणिक अर्हता व अनुभवानुसार ज्या पदाकरिता प्रथमदर्शनी पात्र ठरत असेल त्या पदांपैकी कोणत्या पदाच्या पदभरतीकरिता सहभागी व्हायचे याचा सर्वस्वी निर्णय उमेदवारांचा राहील. उमेदवार प्रथमदर्शनी ज्या पदाकरिता पात्र ठरत असेल व त्या पदाकरिता उमेदवाराने अर्ज/आवश्यक परीक्षा शुल्क (Non-Refundable) न भरल्यास/परीक्षेस उपस्थित न राहिल्यास सदर पदाकरिता उमेदवाराच्या नांवाचा विचार केला जाणार नाही तसेच या संदर्भात उमेदवाराची कोणतीही विनंती/अभिवेदन/अर्ज मान्य केले जाणार नाहीत अथवा संधी उपलब्ध करुन दिली जाणार नाही याची उमेदवाराने नोंद घ्यावी.

१७.१. **सामायिक परीक्षा शुल्क :-**

i) अमागास प्रवर्गातून अर्ज करणाऱ्या उमेदवारांकरिता सामायिक परीक्षा शुल्क रु.१०००/- (रुपये एक हजार फक्त) इतके राहील. मागासवर्गीय उमेदवारांकरिता सामायिक परीक्षा शुल्क रु.९००/- (रुपये नऊशे फक्त) इतके राहील. (सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.प्रानिमं १२२३/प्र.क्र.१४/का.१३-अ, दिनांक १४/०२/२०२३) माजी सैनिकांकरिता सामायिक परीक्षा शुल्क लागू राहणार नाही.

ii) सेवाप्रवेश नियमानुसार पदांकरिता विहित केलेली शैक्षणिक अर्हता विचारात घेऊन सामायिक परीक्षेकरिता पदांची Group मध्ये विभागणी करण्यात आली आहे.

iii) उमेदवारास ज्या पदांकरिता अर्ज करावयाचा असेल त्या प्रत्येक पदाकरिता उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरणे आवश्यक राहील.

iv) उमेदवारास त्याच्या शैक्षणिक अर्हता व अनुभवानुसार एक/एकापेक्षा जास्त नियुक्ती प्राधिकाऱ्यांच्या अंतर्गत असलेल्या पदांकरिता अर्ज करता येईल.

v) उमेदवारास एका Group करिता एकच सामायिक परीक्षा शुल्क जमा करावे लागेल. तसेच एका Group करिता एकच सामायिक परीक्षा द्यावी लागेल. परीक्षा एकापेक्षा जास्त सत्रात (Multiple Sessions) झाल्यास Normalization-Mean Standard Deviation Method नुसार उमेदवाराने सामायिक परीक्षेत प्राप्त केलेले गुण हे संबंधित Group मधील ज्या पदांकरिता उमेदवाराने अर्ज सादर केला असेल त्या पदांकरिता विचारात घेण्यात येतील. ज्या पदांकरिता उमेदवाराने अर्ज सादर केला नसेल त्या पदांकरिता उमेदवारांचे सामायिक परीक्षेचे गुण विचारात घेतले जाणार नाहीत.

vi) उमेदवाराने एकापेक्षा जास्त Group मधील पदांकरिता अर्ज केला असल्यास त्यास प्रत्येक Group करिता स्वतंत्र सामायिक परीक्षा शुल्क जमा करावे लागेल. तसेच प्रत्येक Group करिता असलेली सामायिक परीक्षा स्वतंत्रपणे द्यावी लागेल.

| Group | पदनाम (Post) | सामायिक परीक्षा शुल्क |
|---|---|---|
| Group-A | १. निदेशक (पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रम) (मेकॅनिकल टेक्नॉलॉजी)<br>२. निदेशक (पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रम) (इलेक्ट्रिकल टेक्नॉलॉजी)<br>३. निदेशक (पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रम) (ऑटोमोबाईल सर्विसिंग टेक्नॉलॉजी)<br>४. निदेशक (पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रम) (इलेक्ट्रॉनिक्स टेक्नॉलॉजी) | • अमागास प्रवर्गातील उमेदवार-रु.१०००/-<br>• मागासवर्गीय उमेदवार-रु.९००/-<br>• माजी सैनिक-लागू नाही. |
| Group-B | १. कनिष्ठ सर्वेक्षक नि कनिष्ठ प्रशिक्षणार्थी सल्लागार (तांत्रिक)<br>२. अधीक्षक (तांत्रिक)<br>३. मिलराईट मेन्टेनन्स मेकॅनिक (यांत्रिक/विद्युत/इलेक्ट्रॉनिक्स)<br>४. वसतीगृह अधिक्षक<br>५. भांडारपाल<br>६. सहायक भांडारपाल | • अमागास प्रवर्गातील उमेदवार-रु.१०००/-<br>• मागासवर्गीय उमेदवार-रु.९००/-<br>• माजी सैनिक-लागू नाही. |
| Group-C | वरिष्ठ लिपिक | • अमागास प्रवर्गातील उमेदवार-रु.१०००/-<br>• मागासवर्गीय उमेदवार-रु.९००/-<br>• माजी सैनिक-लागू नाही. |

१७.२. **व्यावसायिक चाचणी शुल्क :-**

i) निदेशक (पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रम) पदाकरिता सामायिक परीक्षेत (परीक्षा एकापेक्षा जास्त सत्रात (Multiple Sessions) झाल्यास Normalization-Mean Standard Deviation Method नुसार) ४५% किंवा त्यापेक्षा अधिक गुण प्राप्त केलेले उमेदवार व्यावसायिक चाचणीकरिता पात्र ठरतील.

ii) अमागास प्रवर्गातील उमेदवाराने व्यावसायिक चाचणी शुल्क रु.१०००/- (रुपये एक हजार फक्त) व मागासवर्गीय उमेदवाराने व्यावसायिक चाचणी शुल्क रु.९००/- (रुपये नऊशे फक्त) इतके भरणे आवश्यक राहील. माजी सैनिकांकरिता व्यावसायिक चाचणी शुल्क लागू राहणार नाही.

iii) व्यावसायिक चाचणीकरिता पात्र ठरलेल्या उमेदवाराने प्रत्येक पदाकरिता स्वतंत्र व्यावसायिक चाचणी शुल्क जमा करणे आवश्यक राहील.

१७.३. सामायिक परीक्षा शुल्क तसेच व्यावसायिक चाचणी शुल्क ऑनलाईन पद्धतीने स्विकारण्यात येईल. ऑनलाईन पद्धती व्यतिरिक्त अन्य कोणत्याही मार्गाने परीक्षा शुल्क स्विकारण्यात येणार नाही. सामायिक परीक्षा शुल्क तसेच व्यावसायिक चाचणी शुल्कावर Payment Gateway शुल्क अतिरिक्त लागू राहील.

१७.४. कोणत्याही कारणास्तव पदभरती प्रक्रिया स्थगित/रद्द झाल्यास पदभरती शुल्क उमेदवारास परत करण्यात येणार नाही.

१८. **ऑनलाईन अर्ज प्रक्रिया :-**

१८.१. उमेदवारास दिनांक **१७/०२/२०२३** ते **०९/०३/२०२३** या कालावधीत www.dvet.gov.in या वेबपोर्टलवर पदभरती संदर्भातील ऑनलाईन अर्ज उपलब्ध राहील. कोणत्याही परिस्थितीत हस्तदेय/टपाल/कुरीअर इत्यादीद्वारे ऑफलाईन पद्धतीने तसेच ई-मेल अथवा अन्य ऑनलाईन पद्धतीने प्राप्त झालेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

१८.२. सेवायोजन कार्यालये/समाज कल्याण विभाग/आदिवासी विकास विभाग/जिल्हा सैनिक बोर्ड/अपंग कल्याण कार्यालये इत्यादी मध्ये नांव नोंदणी केलेल्या तसेच प्रकल्पग्रस्त/भूकंपग्रस्त/अंशकालीन पदवी/पदविकाधारक उमेदवारांनी देखील ऑनलाईन अर्ज सादर करणे आवश्यक राहील.

१८.३. ऑनलाईन अर्ज करण्याकरिता उमेदवाराने Mozilla Firefox / Google Chrome / Microsoft Edge या browsers चा वापर करावा.

१८.४. Application Link वर Click करुन उमेदवारास त्याचे नांव, नांवात बदल झाला असल्यास त्याचा तपशिल, जन्मतारीख, मोबाईल क्रमांक, E-mail ID इत्यादी प्राथमिक माहिती भरुन प्रथम नोंदणी करणे आवश्यक राहील.

१८.५. नोंदणी झाल्यानंतर प्राप्त झालेल्या UserID व Password द्वारे Log In केल्यानंतर उमेदवारास वैयक्तिक माहिती (Personal Details), अतिरिक्त माहिती (Additional Details) तसेच शैक्षणिक अर्हता व अनुभव यांचा तपशिल भरण्याकरिता उपलब्ध होईल. सदर पदभरतीच्या अनुषंगाने पुढील सर्व कार्यवाहीकरिता उमेदवाराने त्याचा UserID व Password जतन करुन ठेवणे आवश्यक राहील.

१८.६. उमेदवाराने ऑनलाईन अर्जाकरिता स्वतःचा फोटो (Colour Photo with White background, File size ८०-२०० KB, २०० dpi, JPG/JPEG format, photo size ३.५ cm. x ४.५ cm.) (फोटो ६ महिन्यांपेक्षा जास्त कालावधीपूर्वीचा नसावा), स्वाक्षरी (File size ५०-२०० KB, JPG/JPEG format), शैक्षणिक अर्हता व अनुभवाची प्रमाणपत्रे, जात प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र, अधिवासाचा दाखला, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, अनाथ, दिव्यांग, खेळाडू, माजी सैनिक या संदर्भातील दाखले, प्रमाणपत्रे, ओळखपत्र (File size १०० kb-२ mb, JPG/JPEG format) ऑनलाईन अर्जासोबत अपलोड करणे आवश्यक राहील.

१८.७. उमेदवाराने संपूर्ण अर्ज भरुन त्यासोबत आवश्यक प्रमाणपत्र/दाखले इत्यादी अपलोड केल्यानंतर आवश्यक ते पदभरती परीक्षा शुल्क ऑनलाईन पद्धतीने विहित मुदतीत/वेळेत अदा करणे आवश्यक राहील. पदभरती परीक्षा शुल्क अदा केल्यानंतर Payment Transaction Successful झाले असल्याबाबतची खातरजमा करण्याची सर्वस्वी जबाबदारी उमेदवाराची राहील. Payment Transaction Successful झाल्यानंतरच उमेदवाराचा अर्ज अंतिम समजण्यात येईल. तद्नंतर उमेदवारास अर्जात कोणताही बदल करता येणार नाही.

१८.८. उमेदवारास अर्जात नमूद केलेल्या माहितीच्या आधारे मूळ प्रमाणपत्र पडताळणीच्या अधिन राहून पदभरती प्रक्रियेत सहभागी होण्यास परवानगी देण्यात येईल. उमेदवारास पदभरती प्रक्रियेत सहभागी होण्यास परवानगी दिली याचा अर्थ उमेदवार पात्र आहे असे नाही. पदभरतीच्या कोणत्याही टप्प्यावर उमेदवाराने सादर केलेली माहिती चूकीची / खोटी आढळून आल्यास किंवा उमेदवाराने पदभरती प्रक्रियेत कोणतेही गैरवर्तन केल्यास किंवा कोणत्याही प्रकारचा दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास त्यास पदभरती प्रक्रियेत सहभागी होण्याकरिता तात्काळ अपात्र ठरविण्यात येईल.

१८.९. सामायिक परीक्षा तसेच व्यावसायिक चाचणी परीक्षेकरिता उपस्थित राहण्याकरिता उमेदवाराकडे व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाने निर्गमित केलेले अधिकृत प्रवेशपत्र (Admit Card) असणे आवश्यक राहील. प्रवेशपत्राशिवाय उमेदवारास परीक्षेस उपस्थित राहण्याची परवानगी देण्यात येणार नाही. उमेदवारांना सामायिक परीक्षा तसेच व्यावसायिक चाचणी परीक्षेचे प्रवेशपत्र (Admit Card) प्राप्त करुन घेण्यासाठी उमेदवारांना E-mail / S.M.S. द्वारे लिंक पाठविण्यात येईल. उमेदवाराने सदर लिंकचा वापर करुन संकेतस्थळावरुन प्रवेशपत्र (Admit Card) डाऊनलोड करुन घेणे आवश्यक राहील. प्रवेशपत्राबाबत (Admit Card) उमेदवारांशी कोणताही पत्रव्यवहार करण्यात येणार नाही.

१८.१०. पदभरतीसंदर्भातील माहिती वेळोवेळी www.dvet.gov.in या संकेतस्थळावर उमेदवारांकरिता प्रसिद्ध करण्यात येईल. तसेच सामयिक परीक्षा व व्यावसायिक चाचणी संदर्भात उमेदवारास वेळोवेळी त्याने UserID व Password तयार करतांना दिलेल्या E-mail ID / मोबाईल क्रमांकावर E-mail / S.M.S. द्वारे कळविण्यात येईल. या संदर्भात कोणताही पत्रव्यवहार करण्यात येणार नाही.

१८.११. परीक्षांचे आयोजन सर्वसाधारणपणे जिल्हा स्तरावर करण्यात येईल. तथापि, पदभरतीकरिता प्राप्त अर्ज विचारात घेऊन परीक्षेचे ठिकाण निश्चित करण्याचे / बदल करण्याचे अधिकार संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांना राहतील.

१८.१२. सामायिक परीक्षेचे स्वरुप खालीलप्रमाणे राहील.

| अ. क्र. | पदनाम | विषयनिहाय प्रश्नसंख्या | दर्जा | माध्यम | एकूण प्रश्न संख्या | प्रत्येक प्रश्ना-साठी गुण | एकूण गुण | काला-वधी | परीक्षेचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | निदेशक (पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रम) Instructor (Pre-Vocational Course) | 1) Marathi Language (15)<br>2) English Language (15)<br>3) General Intelligence (15)<br>4) General Knowledge (15) | माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (S.S.C.) | मराठी व इंग्रजी | ६० | २ | १२० | १ तास (६० मिनिटे) | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाची (Objective MCQ Type) **Computer Based Test (CBT-1)**<br>**Syllabus**<br>**1) General Intelligence -** As per standard syllabus<br>**2) Marathi Language -** Parts of Sentence (Karta, Karma etc), Tenses-03 types, Kinds of sentences, Identification of Samaas (Dvigu, Dvandwa, Avyayeebhav), Change of gender(ling), Change of Number (vachan), Synonyms, Antonyms, Correction of Sentence Unseen Passage, Identification of Prayog (Kartari, Karmani,Bhave)<br>**3) English Language -** Questions in this component will be designed to test the candidate's understanding and knowledge of English language and will be based on spot the error, fill in the blanks, synonyms, antonyms, spelling/detecting mis-spelt words, idioms & phrases, one word substitution, Improvement of sentences, active/passive voice of verbs, conversion Into direct/ indirect narration, shuffling of sentence parts, comprehension passage.<br>**4) General Knowledge -** Geography, Environment, Social History, Current affairs (questions about Maharashtra) |
| २ | कनिष्ठ सर्वेक्षक नि कनिष्ठ प्रशिक्षणार्थी सल्लागार (तांत्रिक) Junior Surveyor cum Junior Apprenticeship | 1) Marathi Language (25)<br>2) English Language (25) | माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (S.S.C.) | मराठी व इंग्रजी | १०० | २ | २०० | १ १/२ तास (९० मिनिटे) | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाची (Objective MCQ Type) **Computer Based Test (CBT)**<br>**Syllabus**<br>**1) General Intelligence -** |

| अ. क्र. | पदनाम | विषयनिहाय प्रश्नसंख्या | दर्जा | माध्यम | एकूण प्रश्न संख्या | प्रत्येक प्रश्नासाठी गुण | एकूण गुण | कालावधी | परीक्षेचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | Advisor (Technical) | 3) General Intelligence (25)<br>4) General Knowledge (25) | | | | | | | As per standard syllabus<br>**2) Marathi Language -** Parts of Sentence (Karta, Karma etc), Tenses-03 types, Kinds of sentences, Identification of Samaas (Dvigu, Dvandwa, Avyayeebhav), Change of gender(ling), Change of Number (vachan), Synonyms, Antonyms, Correction of Sentence Unseen Passage, Identification of Prayog (Kartari, Karmani,Bhave)<br>**3) English Language -** Questions in this component will be designed to test the candidate's understanding and knowledge of English language and will be based on spot the error, fill in the blanks, synonyms, antonyms, spelling/detecting mis-spelt words, idioms & phrases, one word substitution, Improvement of sentences, active/passive voice of verbs, conversion Into direct/ indirect narration, shuffling of sentence parts, comprehension passage.<br>**4) General Knowledge -** Geography, Environment, Social History, Current affairs (questions about Maharashtra) |
| ३ | अधीक्षक (तांत्रिक)<br>Superintendent (Technical) | | | | | | | | |
| ४ | मिलराईट मेन्टेनन्स मेकॅनिक (मेकॅनिकल/विद्युत/ इलेक्ट्रॉनिक्स)<br>Millwrite Maintenance Mechanic (Mechanical/ Electrical/ Electronics) | | | | | | | | |
| ५ | वसतीगृह अधिक्षक<br>Hostel Superintendent | | | | | | | | |
| ६ | भांडारपाल<br>Store Keeper | | | | | | | | |
| ७ | सहायक भांडारपाल<br>Assistant Store Keeper | | | | | | | | |
| ८ | वरिष्ठ लिपिक<br>Senior Clerk | 1) Marathi Language (25)<br>2) English Language (25)<br>3) General Intelligence (25)<br>4) General Knowledge (25) | पदवी (Graduation) | मराठी व इंग्रजी | १०० | २ | २०० | १ १/२ तास (९० मिनिटे) | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाची (Objective MCQ Type) **Computer Based Test (CBT)**<br>**<u>Syllabus</u>**<br>**1) General Intelligence -** As per standard syllabus<br>**2) Marathi Language (Question level HSC) -** Parts of Sentence (Karta, Karma etc), Tenses-03 types, Kinds of sentences, Identification of Samaas (Dvigu, Dvandwa, Avyayeebhav), Change of gender(ling), Change of Number (vachan), Synonyms, Antonyms, Correction of Sentence Unseen Passage, Identification of Prayog (Kartari, Karmani,Bhave)<br>**3) English Language (Question level HSC) -** Questions in this component will be designed to test the |

| अ. क्र. | पदनाम | विषयनिहाय प्रश्नसंख्या | दर्जा | माध्यम | एकूण प्रश्न संख्या | प्रत्येक प्रश्ना-साठी गुण | एकूण गुण | काला-वधी | परीक्षेचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | candidate's understanding and knowledge of English language and will be based on spot the error, fill in the blanks, synonyms, antonyms, spelling/detecting mis-spelt words, idioms & phrases, one word substitution, Improvement of sentences, active/passive voice of verbs, conversion Into direct/ indirect narration, shuffling of sentence parts, comprehension passage.<br>**4) General Knowledge -** Geography, Environment, Social History, Current affairs (questions about Maharashtra) |

१८.१३. सामायिक परीक्षेची (CBT-1/CBT) Answer Key संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल व Answer Key संदर्भात उमेदवारांचे आक्षेप असल्यास उमेदवारास प्रति प्रश्न रु.२००/- इतके आक्षेप हाताळणी शुल्क (Objection Handling Fees) (Non-Refundable) विहित कालमर्यादेत ऑनलाईन अदा करुन आक्षेप नोंदविता येईल. उमेदवाराने नोंदविलेल्या आक्षेपाच्या अनुषंगाने पडताळणी करुन त्याबाबतचा निर्णय संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

१८.१४. परीक्षा एकापेक्षा जास्त सत्रात (Multiple Sessions) झाल्यास Normalization-Mean Standard Deviation Method नुसार उमेदवारांचे सामायिक परीक्षेतील (CBT-1/CBT) गुण निश्चित करण्यात येऊन निकाल जाहिर करण्यात येईल.

**Mean Standard Deviation Method**

$$\hat{M}_{ij} = \frac{\bar{M}_t^g - M_q^g}{\bar{M}_{ti} - M_{iq}} (M_{ij} - M_{iq}) + M_q^{gm}$$

Where:

$\hat{M}_{ij}$ = Normalized marks of j^th candidate in the i^th shift.

$\bar{M}_t^g$= is the average marks of the top 0.1% of the candidates considering all shifts (number of candidates will be rounded-up).

$M_q^g$= is the sum of mean and standard deviation marks of the candidates in the examination considering all shifts.

$\bar{M}_{ti}$= is the average marks of the top 0.1% of the candidates in the i^th shift (number of candidates will be rounded-up).

$M_{iq}$= is the sum of mean marks and standard deviation of the i^th shift.

$M_{ij}$= is the actual marks obtained by the j^th candidate in i^th shift.

$M_q^{gm}$= is the sum of mean marks of candidates in the shift having maximum mean and standard deviation of marks of candidates in the examination considering all shifts.

Calculation of marks will be done up to 5 decimal places.

१८.१५. कनिष्ठ सर्वेक्षक नि कनिष्ठ प्रशिक्षणार्थी सल्लागार (तांत्रिक), अधीक्षक (तांत्रिक), मिलराईट मेन्टेनन्स मेकॅनिक (यांत्रिक/विद्युत/इलेक्ट्रॉनिक्स), वसतीगृह अधिक्षक, भांडारपाल, सहायक भांडारपाल व वरिष्ठ लिपिक या पदांकरिता सामायिक परीक्षेत (CBT) (परीक्षा एकापेक्षा जास्त सत्रात (Multiple Sessions) झाल्यास Normalization-Mean Standard

Deviation Method नुसार) किमान ४५ टक्के गुण (९०) प्राप्त केलेल्या उमेदवारांचा गुणवत्ता यादीकरिता विचार करण्यात येईल.

१८.१६. निदेशक (पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रम) पदाकरिता सामायिक परीक्षेत (CBT-1) (परीक्षा एकापेक्षा जास्त सत्रात (Multiple Sessions) झाल्यास Normalization-Mean Standard Deviation Method नुसार) किमान ४५ टक्के गुण प्राप्त केलेल्या उमेदवारांची व्यावसायिक चाचणी (CBT-2) घेण्यात येईल. ४५ टक्क्यांपेक्षा कमी गुण प्राप्त केलेले उमेदवार व्यावसायिक चाचणी (CBT-2) तसेच पुढील भरती प्रक्रियेकरिता पात्र राहणार नाहीत.

१८.१७. निदेशक (पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रम) पदाकरिता घेण्यात येणाऱ्या व्यावसायिक चाचणी (CBT-2) चे स्वरुप खालीलप्रमाणे राहील.

| अ. क्र. | पदनाम | विषय | माध्यम | एकूण प्रश्न संख्या | प्रत्येक प्रश्नाकरिता गुण | एकूण गुण | कालावधी | परीक्षेचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | निदेशक (पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रम) Instructor (Pre-Vocational Course) | संबंधित व्यवसाय अभ्यासक्रम (Trade Related) | मराठी व इंग्रजी | ४० | २ | ८० | पाऊण तास (४५ मिनिटे) | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाची (Objective MCQ Type) Computer Based Test (CBT-2)<br>Syllabus for relevant trade (Available on www.dvet.gov.in web portal) |

१८.१८. निदेशक (पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रम) पदांबाबत ज्या उमेदवारांनी दोन किंवा त्यापेक्षा अधिक व्यवसायातील पदांकरिता अर्ज केला असेल अशा उमेदवारांनी त्या-त्या पदाकरिता असलेली व्यावसायिक चाचणी देणे आवश्यक राहील. उमेदवार संबंधित पदाच्या व्यावसायिक चाचणीकरिता अनुपस्थित राहिल्यास त्या पदाच्या निवड प्रक्रियेकरिता उमेदवाराच्या नावाचा विचार केला जाणार नाही.

१८.१९. व्यावसायिक चाचणी (CBT-2) ची Answer Key संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

१८.२०. व्यावसायिक चाचणी (CBT-2) मधील प्रश्नांसंदर्भात उमेदवारास आक्षेप असल्यास उमेदवारास प्रति प्रश्न रु.२००/- इतके आक्षेप हाताळणी शुल्क (Objection Handling Fees) विहित कालमर्यादेत ऑनलाईन अदा करुन आक्षेप नोंदविता येईल. उमेदवाराने नोंदविलेल्या आक्षेपाच्या अनुषंगाने पडताळणी करुन त्याबाबतचा निर्णय संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

१८.२१. व्यावसायिक चाचणी (CBT-2) परीक्षा एकापेक्षा जास्त सत्रात (Multiple Sessions) झाल्यास Normalization-Mean Standard Deviation Method नुसार उमेदवारांचे गुण निश्चित करण्यात येतील.

१८.२२. निदेशक (पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रम) पदाबाबत सामायिक परीक्षा (CBT-1) व व्यावसायिक चाचणी (CBT-2) या दोन्ही परीक्षांकरिता उपस्थित असलेल्या व एकूण २०० गुणांपैकी किमान ४५ टक्के गुण (९०) प्राप्त केलेल्या उमेदवारांचा गुणवत्ता यादीकरिता विचार करण्यात येईल.

१८.२३. सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्रमांक एसआरव्ही-१०१२/प्र.क्र.१६/१२/१६-अ, दिनांक १३/०८/२०१४ व त्या अनुषंगाने राज्य शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णय/शुद्धीपत्रक/परिपत्रक इत्यादी मधील तरतूदीनुसार उमेदवारांची गुणवत्ता यादी (Merit List) तयार करण्यात येईल.

१८.२४. **प्राधान्यक्रम** :- ज्या पात्र उमेदवारांचे एकूण गुण समान असतील अशा उमेदवारांचा गुणवत्ता यादीतील प्राधान्यक्रम पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात येईल.

i) आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याचा पाल्य असल्यास प्राधान्य देण्यात येईल. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याचा पाल्य म्हणजे महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र.एससीवाय-१२०५/प्र.क्र.१८९/म-७, दि.२३/०१/२००६ अन्वये गठित करण्यात आलेल्या जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीने ज्या कुटुंबास शेतकऱ्याच्या आत्महत्याप्रकरणी मदतीसाठी पात्र ठरविले असेल अशा कुटुंबातील मृत शेतकऱ्याचा पाल्य (पत्नी/मुलगे/मुलगी).

ii) उपरोक्त (i) मधील अट देखील समान ठरत असल्यास अथवा उमेदवार आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याचा पाल्य नसल्यास वयाने ज्येष्ठ असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

iii) उपरोक्त (i) व (ii) मधील अटी देखील समान ठरत असल्यास अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास उच्चस्तर शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारास प्राधान्यक्रम देण्यात येईल.

iv) उपरोक्त (i), (ii) व (iii) मधील अटी देखील समान ठरत असल्यास पदाच्या सेवाप्रवेश नियमामध्ये विहित केलेल्या किमान शैक्षणिक अर्हतेमध्ये उच्चस्तर गुण प्राप्त केलेल्या उमेदवारास प्राधान्यक्रम देण्यात येईल.

१८.२५. गुणवत्ता यादीतील उमेदवारांना मूळ प्रमाणपत्रे, कागदपत्रे पडताळणीकरिता बोलाविण्यात येईल. प्रमाणपत्रे, कागदपत्रे पडताळणीच्या वेळी उमेदवाराने संबंधित मूळ प्रमाणपत्रे, कागदपत्रे, ओळखपत्र व त्याच्या दोन स्वस्वाक्षांकीत प्रतींसह उपस्थित

राहणे आवश्यक राहील. राज्य शासनाने वेळोवेळी दिलेल्या निदेशाच्या अनुषंगाने आवश्यक ती प्रमाणपत्रे संबंधित प्राधिकरणास पडताळणीकरिता पाठविण्यात येतील व उमेदवारांची प्रथम तात्पुरती निवडसूची (Provisional Selection List) संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. मूळ प्रमाणपत्रे, कागदपत्रे तपासणीच्या वेळी उमेदवार विहित शैक्षणिक अर्हता, अनुभव अथवा दोन्ही धारण करित नसल्यास अथवा उमेदवाराचे प्रमाणपत्र, कागदपत्र खोटे अथवा बनावट आढळून आल्यास अथवा उमेदवाराने मूळ प्रमाणपत्रे, कागदपत्रे सादर न केल्यास उमेदवारास अंतिम निवडसूची (Final Selection List) करिता अपात्र ठरविण्यात येईल व त्याबाबत उमेदवाराची कोणतेही तक्रार विचारात घेतली जाणार नाही. तद्नंतर अंतिम निवडसूची (Final Selection List) संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

१८.२६. **निवडसूचीची कालमर्यादा** :- निवड समितीने तयार केलेली निवडसूची १ वर्षासाठी किंवा निवडसूची तयार करताना ज्या दिनांकापर्यंतची रिक्त पदे विचारात घेण्यात आली आहेत त्या दिनांकापर्यंत, यापैकी जे नंतर घडेल त्या दिनांकापर्यंत विधीग्राह्य राहील. त्यानंतर ही निवडसूची व्यपगत होईल. (सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक प्रानिमं १२२२/प्र.क्र.५४/ का.१३-अ, दिनांक ०४/०५/२०२२)

१८.२७. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक प्रानिमं १२२२/प्र.क्र.५४/का.१३-अ, दिनांक ०४/०५/२०२२ नुसार गट-क मधील पदांकरिता मुलाखती घेण्यात येणार नसल्याने सदर जाहिरातीमधील पदांकरिता मुलाखती घेण्यात येणार नाही.

१८.२८. पदभरतीसंदर्भाती सर्व माहिती वेळोवेळी www.dvet.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. या संदर्भात उमेदवारांशी अन्य कोणताही पत्रव्यवहार करण्यात येणार नाही. त्यामुळे सदर कालावधीत उमेदवाराने नियमितपणे www.dvet.gov.in या संकेतस्थळावर पदभरतीसंदर्भातील सूचना पाहणे आवश्यक राहील.

१८.२९. संपूर्ण पदभरती प्रक्रियेस उमेदवाराने स्वखर्चाने उपस्थित राहणे आवश्यक राहील.

१९. **मराठी/हिंदी भाषा परीक्षा :**- निवड झालेल्या उमेदवाराने महाराष्ट्र शासनाने शासकीय कर्मचाऱ्यांकरिता वेळोवेळी विहित केलेली मराठी व हिंदी भाषा संदर्भात अर्हता धारण करणे आवश्यक राहील. उमेदवार सदर अर्हता धारण करीत असल्यास उमेदवाराने संबंधित प्रमाणपत्रे विहित कालमर्यादेत सादर करणे आवश्यक राहील.

२०. **संगणक अर्हता** :- निवड झालेल्या उमेदवाराने महाराष्ट्र शासनाने शासकीय कर्मचाऱ्यांकरिता वेळोवेळी विहित केलेली संगणक हाताळणीबाबत अर्हता धारण करणे अनिवार्य राहील. उमेदवार सदर अर्हता धारण करीत असल्यास उमेदवाराने संबंधित प्रमाणपत्रे विहित कालमर्यादेत सादर करणे आवश्यक राहील.

२१. **प्रशिक्षण** - निवड झालेल्या उमेदवाराने संबंधित पदाकरिता वेळोवेळी विहित केलेले प्रशिक्षण विहित कालमर्यादेत पूर्ण करणे आवश्यक राहील.

२२. सदर संपूर्ण पदभरती प्रक्रिया ही शासनाने पदभरती संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेले नियम, आदेश, निर्णय इत्यादी मधील तरतुदीनुसार करण्यात येईल.

२३. संपूर्ण पदभरती प्रक्रियेबाबतचा तपशिल वेळोवेळी www.dvet.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. त्यामुळे उमेदवारांनी पदभरतीच्या काळात पदभरतीसंदर्भात संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली माहिती नियमितपणे पाहणे आवश्यक आहे. संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली माहिती उमेदवाराने न पाहिल्यास व त्यामुळे उमेदवारास पदभरती संदर्भात कोणतीही अडचण उद्भवल्यास उमेदवाराची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

२४. सदर पदभरतीच्या अनुषंगाने कोणीही आर्थिक/इतर स्वरुपाची मागणी केल्यास उमेदवाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य (Anti-corruption Bureau, Maharashtra State) यांचेकडे १०६४ या हेल्पलाईन क्रमांकावर अथवा acbmaharashtra.net या मोबाईल ॲप द्वारे तक्रार नोंदवावी.

**२५. ऑनलाईन अर्जाची लिंक संचालनालयाच्या www.dvet.gov.in या संकेतस्थळावर दिनांक १७/०२/२०२३ ते ०९/०३/२०२३ (रात्रौ ११.५९ पर्यंत) या कालावधीत उपलब्ध राहील.**

**२६. ऑनलाईन अर्ज भरण्यासंदर्भात मदतीकरिता दूरध्वनीद्वारे Helpdesk No. 7353927779 वर सकाळी ९.०० ते सायंकाळी ६.०० या कालावधीत संपर्क साधावा अथवा dvethelpdesk2022@gmail.com वर आपणास हव्या असलेल्या मदतीचा तपशिल कळवावा.**

स्वाक्षरीत/-
( दि. अं. दळवी )
संचालक,
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई-१.